

# बिरजू आणि उडता घोडा




दीपा अगरवाल

अनुवाद
विद्यागौरी टिळक

चित्रे
सुबीर रॉय



ISBN 978-81-237-3176-6

प्रथम प्रकाशन : 2000 (*शके* 1922)

पुनर्मुद्रण : 2003, 2004, 2009 (दोनदा), 2012, 2013 (दोनदा) (*शके* 1935)

मूळ © दीपा अगरवाल, 1998

मराठी अनुवाद © नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, 2000

Birju and the Flying Horse *(English Original)*
Birju Aani Udata Ghoda *(Marathi)*

**₹ 30.00**

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया
नेहरू भवन, 5 इन्स्टिट्युशनल एरिया, फेज-II
वसंत कुंज, नवी दिल्ली-110 070 यांनी प्रकाशित केले.
Website : www.nbtindia.gov.in

# बिरजू आणि उडता घोडा

दीपा अगरवाल

अनुवाद
विद्यागौरी टिळक

चित्रे
सुबीर रॉय



nbt.india
एकः सूते सकलम्

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया





एका लहानशा गावात बिरजू नावाचा एक मुलगा राहात होता. इतर मुलांप्रमाणे आपणही खूप पळावे, खेळावे असे त्याला वाटत असे. पण तो एका पायाने अधू होता. सरळ चालणेसुद्धा त्याला जड जात असे.

बिरजूचे वडील त्यांच्या घराजवळील एका धनिक माणसाकडे माळीकाम करीत. त्याची आई लोकांची भांडी घासत असे.

एके दिवशी त्याचे वडील घरी आले, तेव्हा खूप खुशीत दिसत होते. ''बघ, बिरजू,'' ते म्हणाले, ''बघ मी काय आणलंय.'' एक जुना लाकडी घोडा त्यांनी उचलून आणलेला होता. ''बाईसाहेबांनी दिलाय.''

घोडा तसा जुनाट, खूप वापरलेला होता. ठिकठिकाणी त्याचा रंग उडालेला होता, खोगीर फाटलेले होते आणि एक कान निघायच्या बेतात होता. पण बिरजू मात्र ते खेळणे पाहून अतिशय हरखून गेला. यापूर्वी अशी वस्तू त्याला कधीच मिळालेली नव्हती. त्याने चटकन् घोड्यावर बसून मागे-पुढे झुलायला सुरूवात केली.

''ही खरी मजा!'' त्याच्या मनात आले, ''खऱ्या घोड्यावर बसल्यावरही बहुतेक असंच वाटत असणार!'' शंभरएक वेळी तो असा मागे-पुढे झुलला असेल, तेवढ्यात एक नवल घडले. घोड्याने पुढे झेप घेतली होती. जिवंत, खऱ्याखुऱ्या घोड्याने घ्यावी तशी!





"मला बहुतेक भास होत असावा," असे म्हणत, बिरजूने आपली मांड पक्की केली. पण पुढच्याच क्षणी त्याला आश्चर्याचा धक्का बसला. घोडा हळूहळू वर हवेत तरंगायला लागला होता. तो उडत होता...चक्क उडत होता!

ते वर जाऊ लागले, तसा वारा बिरजूच्या कानाशी शीळ घालू लागला. वर...आणखी वर...आणखी वर. माणसं, घरं, झाडं सगळं खूप खूप खाली राहिलं.

घोड्याचे खिंकाळून हसणे ऐकल्यावर बिरजू आणखीच अचंबित झाला. "फसलास ना?" घोड्याने विचारले, "मी एक साधा, जुनाट झुलता घोडा वाटलो की नाही तुला?"

"फसलो खरा मी," पडण्याच्या भीतीने घोड्याला घट्ट धरत बिरजू म्हणाला. "मला तरी कसं ठाऊक असणार?"

घोडा पुन्हा खिंकाळला. "मी तुला जगात वाट्टेल तिथे घेऊन जाऊ शकतो. कुठे जायला आवडेल तुला?"

बिरजू क्षणभर विचार करून म्हणाला, "पूर्वेकडे. जिथे सूर्य उगवतो तिथे."

घोडा वाऱ्यापेक्षाही जास्त वेगाने उडू लागला. बिरजूला आता खूपच गंमत वाटू लागली. "मला नेहमीच आपणही धावावं, असं वाटायचं. पण हे तर आणखी छान आहे."




खूप खूप दूरच्या एका टेकडीजवळ येईपर्यंत घोडा उडतच होता. सोनेरी, नारिंगी धुक्याने ती टेकडी वेढलेली होती. ते धुके इतके तेजस्वी होते की, त्यामुळे बिरजूचे डोळे दुखू लागले. सुदैवाने, घोडा एका गुहेत शिरला. बिरजू चकित होऊन पाहू लागला. एक म्हातारी बाई तिथे बसलेली होती. चमकदार सोनेरी धाग्याचे सूत ती कातत होती. वर्षानुवर्षे ती हेच काम करीत असावी, असे दिसत होते. कारण त्या सुताचे एकमेकांमध्ये गुंतलेले मोठमोठे ढीग तिथे पडलेले होते.


"हिला पूर्वेची शहाणी स्त्री म्हणून ओळखतात," घोडा म्हणाला.

"नमस्कार, आजीबाई," बिरजूने नमस्कार केला.

"सुखी हो, बेटा," आजीबाई म्हणाल्या. "तू चांगला मुलगा दिसतोस. माझ्या सगळ्या सुताचा गुंता झालाय. तेवढं तू सोडवून, गुंडाळून देतोस का?"

"तुम्ही सांगाल तसं!" बिरजू म्हणाला आणि कामाला लागला. शेकडो, हजारो, लाखो धागे तिथे एकमेकात गुंतून पडले होते. पण त्याने खूप मेहनत घेतली आणि शेवटी एकदाचे ते काम पूर्ण झाले.





''धन्यवाद, मुला!'' आजीबाई म्हणाल्या, ''तू एवढी मदत केलीस, त्याबद्दल तुला एक वर द्यावासा वाटतोय. बोल, काय हवंय् तुला?''

बिरजूने बराच विचार केला. मग म्हणाला, ''माझ्या आईला दिवसभर इतके कष्ट करावे लागू नयेत, असं मला फार वाटतं.''

''तथास्तु,'' आजीबाई उद्गारल्या. मग तिथले एक सुंदर निळे फूल तोडून त्याच्या हातात ठेवत त्यांनी सांगितले, ''जर कधी तू पश्चिमेला गेलास तर, हे तिथे राहाणाऱ्या माझ्या बहिणीला दे.''

त्यांचे आभार मानून बिरजू घरी परतला. ते नुकतेच घरी पोहोचतात, तेवढ्यात त्याची आईही आली.


बिरजूला पाहताच तिने त्याला कुशीत घेतले. आनंदाने हसत ती सांगू लागली, ''मोठा भाग्याचा दिवस उजाडला आज! बाईसाहेबांचा हिऱ्याचा हार आज हरवला होता. तो मी त्यांना शोधून दिला. त्यांनी बघ मला काय दिलंय्!'' तिच्या हाती पैशांनी भरलेली एक थैली होती. तिच्या प्रामाणिकपणावर खूष होऊन, तिला आरामात राहाता यावे, अशी सोय मालकीण बाईंनी करून दिली होती.

बरेच दिवस बिरजू कुठेच गेला नाही. त्याची आई दिवसभर घरी असल्यामुळे तो आता खूप आनंदात होता. मग एक दिवस त्याला आपल्या झोपडीच्या कोपऱ्यात पडलेले ते निळे फूल दिसले. नवल म्हणजे, अजूनही ते ताजेच्या ताजेच होते.

त्याला पश्चिमेकडच्या म्हातारीची आठवण झाली. आणि एक दिवस आई बाजारात गेली असताना, आपल्या उडत्या घोड्यावर बसून तो निघाला.

घोडा अनेक गावे, अनेक नद्या पार करीत उडत राहिला आणि अखेर ते एका निर्जन, मोकळ्या जागी येऊन पोहोचले. तिथे आधीच्या आजीबाईंपेक्षाही म्हातारी अशी एक स्त्री बसून एका मोठ्ठया मागावर कापड विणत होती. जिकडे तिकडे कापडाचे ढीग अस्ताव्यस्त पसरलेले होते.





बिरजूने आदराने तिला नमस्कार केला आणि फूल दिले. ''तुमच्या बहिणीनं हे पाठवलं आहे.'' त्याने सांगितले.

''अरे वा! तू तिला भेटून आलास तर!'' ती म्हणाली. ''मुला, तू थोडी मदत करशील का? माझे कापडाचे तागे सगळे उलगडले गेलेत. तू ते नीट गुंडाळून, रचून ठेवशील का?''


अधू पायामुळे बिरजूला हे काम खूपच अवघड होत होते. पण त्याने ते प्रयत्नपूर्वक तडीस नेले. प्रसन्न होऊन आजीबाईंनी त्याला एक वर देऊ केला.

बिरजूला शेजारच्या धनिकाकडे माळीकाम करून करून वाकलेल्या आपल्या वडिलांची आठवण आली. ''मला वाटतं माझ्या वडिलांकडे पिकवायला स्वतःचा मळा हवा होता,'' तो म्हणाला.

''मान्य,'' आजीबाई म्हणाल्या. ''आता जर समजा तू दक्षिणेकडे गेलास, तर तिथल्या माझ्या बहिणीला भेट आणि तिला हे दे.'' त्यांनी एक अद्‌भुत वाटणारे फळ बाहेर काढले. धड ना अक्रोडासारखे, धड ना भुईमुगाच्या शेंगेसारखे, धड ना नारळासारखे असे त्याचे तिन्ही मिळून एकत्र असल्यासारखे रूप होते.

त्यांचे आभार मानून बिरजू घोड्यावरून घराकडे उडत निघाला. सुदैवाने त्याची आई अजून आली नव्हती. ती लौकरच घरी आली आणि मागोमाग वडीलही आले.

''एक आनंदाची बातमी आहे,'' ते म्हणाले, ''मालकांनी माझ्या प्रामाणिकपणावर, विश्वासूपणावर संतुष्ट होऊन जमिनीचा एक मोकळा पडलेला तुकडा आपल्याला दिलाय.'' बोलता बोलता त्यांचा स्वर दुःखी झाला, ''मालकांची मुलगी अतिशय आजारी आहे. सगळ्या वैद्यांनी आशा सोडली आहे. दानधर्म केल्याने तरी मुलीचा जीव वाचेल, अशी आशा त्यांना वाटते आहे.''



बिरजूनेही त्या छोट्या, गोड मुलीला अनेकदा बागेत खेळताना पाहिलेले होते. त्यालाही तिच्याबद्दल वाईट वाटले. आणि मग त्याला दक्षिणेकडच्या शहाण्या म्हातारीची आठवण झाली.

बिरजू हळूच उठून घोड्याजवळ गेला. ''शक्य तेवढ्या वेगानं दक्षिणेकडे चल,'' तो घोड्याच्या कानाशी कुजबुजला. क्षणातच त्याने वेग घेतला.

खूप दूरदूरचे समुद्र पार करीत ते उडत राहिले आणि मग एका बेटावर आले. तिथे त्यांना गालिच्यावर सुंदर भरतकाम करीत असलेली एक म्हातारी दिसली.

बिरजूने तिला नमस्कार केला आणि तिच्या बहिणीने पाठवलेले ते चमत्कारिक फळ तिला दिले.

''तू माझ्या बहिणीला भेटून आलास तर!'' ती म्हणाली, ''मुला, मदत करशील का थोडी? माझ्या भरतकामाचा दोरा सुईतून निघालाय आणि मला काही तो परत ओवता येत नाहीय.''

जाडसर, विचित्रसा तो दोरा होता आणि त्यामानाने सुईचे नाक छोटेसेच होते. पण बिरजूने कसातरी प्रयत्नपूर्वक सुईत दोरा ओवला.

आजीबाईंनी आनंदाने म्हटले, ''आता मीही तुला एक वर देते. पण मुला, नीट विचार कर. हा तुला मिळणारा शेवटचा वर असेल.''

बिरजूच्या मनात आपल्या अधू पायाचा विचार आला. तो चांगला व्हावा, अशी केव्हापासूनची त्याची इच्छा होती. पण मग त्याला ती आजारी छोटी मुलगी आठवली.


''मालकांची मुलगी पहिल्यासारखी बरी होऊ दे,'' त्याने ताबडतोब सांगितले.

आजीबाईंनी एक वनस्पती त्याच्या हाती ठेवली आणि म्हटले, ''ही बारीक वाटून तिला दे. सकाळपर्यंत ती खडखडीत बरी होईल.'' पुढे त्या म्हणाल्या, ''हा तुला दिलेला अखेरचा वर होता. पण तू आमच्या वडिलांना, उत्तरेकडच्या आजोबांना भेटावंस, असं मला वाटतं. त्यांना हा शंख देऊन दे आणि मी दिलाय म्हणून सांग.''

बिरजूने शक्य तेवढ्या लवकर घर गाठले. आईच्या लक्षात येणार नाही, अशा बेताने तो हळूच घोड्यावरून उतरला. आत जाऊन त्याने आईकडे ती वनस्पती दिली. ''बारीक वाटून हे त्या मुलीला देऊन टाक. ती सकाळपर्यंत बरी होईल,'' त्याने सांगितले.

''ही कुठे मिळाली तुला?'' आईच्या प्रश्नावर त्याने थोडक्यात सांगितले, ''लौकर जा. वेळ घालवू नकोस. एका माहीतगार बाईंनी दिलीय ती मला.''





त्याच्या आईने सांगितल्याप्रमाणे केले. मालक मुलीसाठी काहीही करून पाहायला तयार होते. ती खरोखरीच सकाळपर्यंत खडखडीत बरी झाली. आणि बिरजूच्या आईला पुन्हा एकवार बक्षिसी मिळाली. पण त्याने त्याचा पाय थोडाच नीट होणार होता!

एके दिवशी त्याने उत्तरेकडच्या आजोबांना भेटायचे ठरविले. ''आपल्याला उत्तरेला जायचंय,'' त्याने घोड्याला सांगितले.

घोड्याने अनेक जंगलांवरून, सरोवरांवरून उड्डाण केले आणि तो एका मोठ्या, बर्फाच्छादित पर्वतावरच्या गुहेसमोर उतरला. गुहेच्या तोंडाशी एक जख्ख म्हातारा माणूस बसलेला होता.

पिकून पांढऱ्या झालेल्या भिवयांना आठ्या घालत, निरखून बघत त्याने विचारले, ''कोण आहे?''

''मी बिरजू. तुमच्या मुलीनं तुमच्यासाठी भेट पाठवलीय.''

''घोड्यावरून उतर. इथे माझ्याजवळ येऊनच तुला ती द्यावी लागेल.''

''पण मी पांगळा आहे. इथे मी घसरून उतरणीवरून खालीच गडगडत जाईन.''

''मी सांगतोय तसं कर,'' म्हातारबुवा कठोरपणे म्हणाले.

''तसंच कर बिरजू,'' घोडाही बारीक खिंकाळला.

बिरजू घाबरतच घोड्यावरून उतरला. त्याने एक पाय जमिनीवर ठेवला...मग दुसरा. आणि जेव्हा त्याने आजोबांच्या हातात शंख ठेवला, तेव्हा सर्वात मोठं आश्चर्य त्याच्या अनुभवाला आलं. तो नीट सरळ उभा होता आणि चालत होता...चक्क चालत होता.



"मी तुमचे किती उपकार मानू!" तो कृतज्ञतेने आजोबांना म्हणाला.

"त्याची काही गरज नाही," ते म्हणाले. "घरी जा आणि आईवडिलांना भेट. सुखी हो!"

उडता घोडा यावेळी अधिक वेगात उडत होता. बिरजूला दोन्ही पायांनी छान पळत येताना पाहून त्याच्या आईवडिलांचा आनंद गगनात मावेनासा झाला. नंतर ते सारे त्यांच्या छोट्याश्या मळ्यामध्ये आनंदाने राहू लागले.





Printed at Rakmo Press Pvt. Ltd., New Delhi-110020





₹ 30.00
ISBN 812373176-0
9788123731766
13140650

NEHRU BAL PUSTAKALAYA

# सिंहुला शिकला गर्जना करायला

इंदु राणा

अनुवाद : अनंत भावे

चित्रे : गुरमीत सिंग

